# कोविड-19 आणि भारतामधील राजकारण

**प्रा.(डॉ.) शिवाजी पाटील ,** राज्यशास्त्र विभाग प्रमुख, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा ईमेल : shivajiraopatil@gmail.com

---

**सारांश :**

कोविड-19 आणि भारतामधील राजकारण या विषयावर प्रस्तुत शोधनिबंधा मध्ये मांडणी करण्यात आलेली आहे. कोविड मुळे भारतातील राजकारणा वरती संभाव्य कसे परिणाम होतील किंवा कुठल्या पद्धतीचे बदल होतील याबाबतचे विवेचन यामध्ये केलेले आहे. कोविड मुळे भारतीय संसदेची अधिवेशने भरू शकली नाहीत त्यामुळे महत्वाच्या विषयावर चर्चाच झाली नाही.भारतामध्ये संसदीय शासन पद्धतीची आहे त्या संसदीय शासन पद्धतीचे चे रूपांतर काही प्रमाणात अध्यक्षीय पद्धतीमध्ये होताना आपल्याला दिसून येते. भारतामधील आजपर्यंतचे संघराज्य हे जास्तीत जास्त को-ऑपरेटिव्ह पद्धतीने चालत आले आहे. कोरोनाच्या काळात मात्र हे संघराज्य संघर्षात्मक संघराज्य पद्धतीने वाटचाल करत आहे. राज्यपालांनी महाराष्ट्र,केरळ ,प.बंगाल इ. राज्यात हस्तक्षेपाची, विरोधाची भूमिका घेतलेली दिसते.राज्यपाल समांतर पद्धतीचे सरकार चालवत आहेत अशी टीका झालेली पाहावयाला मिळते. सर्वोच्च तसेच उच्च न्यायालयाने कोरोंना काळात व्यक्तींची सन्मान जपण्यावर भर दिला होता ही अतिशय महत्वाची बाब आहे. एकूणच नागरिकांचे व्यक्तिस्वातंत्र्य अबाधित ठेवणे, संसदीय शासन पद्धती अधिक सुदृढ करणे आणि प्रगतीचे, धर्मनिरपेक्ष तसेच विधायक राजकारण करणे आवश्यक आहे. या सर्व चांगल्या बाबी करण्यासाठी सिविल सोसायटी तेवढीच प्रगल्भ करणे आवश्यक असून यामध्येच भारतीयांचे हित आहे.

**प्रस्तावना :**

कोविड-19 आणि भारतामधील राजकारण या विषयावर प्रस्तुत शोधनिबंधा मध्ये मांडणी करण्यात आलेली आहे. कोविड मुळे भारतातील राजकारणा वरती संभाव्य कसे परिणाम होतील किंवा कुठल्या पद्धतीचे बदल होतील याबाबतचे विवेचन यामध्ये केलेले आहे.राजकारण म्हणजे आपल्या मनामध्ये केवळ निवडणुकीचे राजकारण हा एक बऱ्यापैकी समज झालेला आहे. परंतु जर आपण राजकारणाची व्याख्या बघितली तर राजकारणाची व्याख्या काय सांगते की अनेक व्यक्तींनी एकत्रितरित्या येऊन निर्णय घेण्याची प्रक्रिया म्हणजे राजकारण होय. प्रत्येक राष्ट्रांमध्ये सत्ता मिळवण्यासाठी आणि देश चालवण्यासाठी अनेक नेते निर्णय घेतात व जे काम करतात त्याला सुद्धा राजकारण म्हणतात. ते केवळ निवडणुका पुरते मर्यादित नसते. कोविड च्या या संपूर्ण प्रक्रियेमध्ये पब्लिक पोलिसी कशी निर्माण झाली भारतामधील विविध शासन संस्थावर आणि जनमानसावर कोविडमुळे कसा परिणाम झाला यांचा अभ्यास या शोधनिबंधामध्ये केला आहे.कोरोंना मुळे खालील प्रकारे भारतीय राजकारणावरती परिणाम झालेला आहे.

**संसदीय शासन व्यवस्थेवरील परिणाम :**

कोविड मुळे भारतीय संसदेची अधिवेशने भरू शकली नाहीत त्यामुळे महत्वाच्या विषयावर चर्चाच झाली नाही.भारतामध्ये संसदीय शासन पद्धतीची आहे त्या संसदीय शासन पद्धतीचे चे रूपांतर काही प्रमाणात अध्यक्षीय पद्धतीमध्ये होताना आपल्याला दिसून येते.भारतामधल्या संसदीय परंपरेमध्ये जर आपण नेहरूंनी संसदीय परंपरांना अतिशय महत्वाचे स्थान दिले आहे. त्यांनी निर्माण केलेल्या काही संसदीय परंपरा होत्या त्या संसदीय परंपरा मध्ये 2014 पासून माननीय नरेंद्र मोदी यांच्या काळापासून यामध्ये मोठा फरक पडलेला दिसून येतो आणि कोरोंना च्या कालामध्ये तर संसदेला दुय्यम स्थान प्राप्त झालेले दिसते. संसदीय शासन पद्धतीचा जर विचार केला तर घटनाकारांनी या एका मुद्द्यावर प्रचंड प्रमाणामध्ये चर्चा केली होती. संसदीय शासन पद्धती पाहिजे की अध्यक्षीय शासन पद्धती पाहिजे यामध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, नेहरू, पटेल यांनी संसदीय शासन पद्धतीचा प्रमाणामध्ये पुरस्कार केला. संसदीय पद्धतीमुळे डायव्हर्सिटी असणाऱ्या भारता मधल्या सगळ्यांना प्रतिनिधित्व मिळेल आणि चांगल्या पद्धतीने जबाबदार पद्धतीने शासन निर्माण होईल अशी त्यांची धारणा होती. संसदीय शासन पद्धतीचे एक महत्त्वाचं वैशिष्ट्य असतं आणि ते म्हणजे कलेक्टिव रिस्पॉन्सिबिलिटी म्हणजेच सामूहिक जबाबदारीचे तत्व होय. यानुसार एखादा मंत्री किंवा संपूर्ण मंत्रिमंडळ, पंतप्रधान हे सर्वजण लोकसभेला जबाबदार असतात. म्हणजे जे निर्णय घेतले जातात या निर्णयाप्रत त्यांना लोकसभेत जबाबदार राहावे लागते. आपण काय निर्णय घेतो एक्झिक्युटिव काय निर्णय घेते हे निर्णय संसदेसमोर मांडावे आठवू लागतात आणि त्याला एक प्रकारची मान्यता घ्यावी लागते. संसदेच्या अधिवेशनांना पंतप्रधान आणि संबंधित मंत्र्यांनी उपस्थित राहून अधिवेशन अतिशय उत्तम पद्धतीने पार पाडणे, त्यामध्ये गोंधळ न घालता शांतपणानं चर्चा करणं ही आपली संसदीय परंपरा आहे.

परंतु 2014 पासून जर आपण बघितलं तर माननीय पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या काळामध्ये या संसदीय परंपरावर कुठेतरी मोठ्या प्रमाणामध्ये बंधने आलेले आपल्याला दिसतात किवा या संसदीय परंपरा खंडित होताना दिसतात. अनेक वेळा पंतप्रधान संसदेसमोर येत नाहीत. अनेक निर्णय ते स्वतः घेतात त्यामुळे सामूहिक जबाबदारीचे हे तत्त्व कुठेतरी हरवत चाललेल आहे असे वाटते. 2019 मध्ये लोकसभेच्या निवडणुका झाल्या.या निवडणुकीमध्ये प्रभावी विरोधी पक्ष नाही याहीपेक्षा आज संसदेमध्ये विरोधी पक्षनेता म्हणून कोणाचीही अधिकृत निवड केलेली नाही.यामुळे संसदीय परंपरेचे मोठ्या प्रमाणामध्ये खच्चीकरण झालेले आहे. त्यामुळे कोरोनाच्या काळामध्ये निर्णय घेत असताना सर्वांना एकत्रित घेऊन विचारविनिमय करून निर्णय घेणे अपेक्षित होते परंतु विरोधक तसेच मंत्रिमंडळा बरोबर चर्चा न करता आपण बघितलं परंतु आपण 22 मार्च, 2020 रोजी अचानकपणे लॉकडाऊन चा निर्णय जाहीर केला आणि कडक लॉक डाऊन लागू केले.या अशा चर्चेविना घेतलेल्या निर्णयामुळे पुढे भारतीयांचे अतोनात हाल झाले. वास्तविक पाहता अशा प्रकारचा मोठा निर्णय घेत असताना संसदीय परंपरेनुसार विरोधी पक्षाच्या नेत्यांना सुद्धा तुम्ही विश्वासात घेऊन त्यांच्याबरोबर चर्चा करून किंवा या जागतिक महामारी बद्दलची माहिती आणि मते तज्ज्ञांकडून घेऊन पुढे जायला पाहिजे अशी अपेक्षा होती परंतु मोदी सरकारने निर्णय अत्यंत कमी वेळामध्ये

आणि त्याची चर्चा न करता जाहीर केला ही बाब चुकीची होती. अमेरिकेत अध्यक्षीय पधतीप्रमाणे मा.मोदी यांनी हा निर्णय घेतला.याठिकाणी संसदेला पूर्णपणे डावलण्यात आले.भारताच्या संभाव्य परिणाम मधील संसदीय परंपरा टिकवणं ही आता सगळयांची मोठी जबाबदारी निर्माण झाली आहे.

**संघराज्य व्यवस्थेमध्ये होत असलेला बदल :**

दुसरा महत्त्वाचा मुद्दा आहे तो म्हणजे संघराज्य व्यवस्थेमध्ये थोडा बदल होठ आहे.अमेरिकेप्रमाणे भारताचे संघराज्य हे पूर्ण संघराज्य नाही.राज्यघटनेच्या पहिल्या कलमामध्ये "इंडिया म्हणजेच भारत हा भारतातील राज्यांचा संघ असेल" अशी तरतूद आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारत हा एकसंघ रहावा त्याच्यामध्ये पुन्हा फुट होऊ नये आणि एवढे कष्ट घेऊन स्वातंत्र्य चळवळ निर्माण करून मिळवलेल्या भारताचे स्वातंत्र्य टिकवण्यासाठी अशा प्रबळ केंद्राची रचना केली आहे. परंतु भारतामध्ये केंद्र आणि राज्य यांच्यामध्ये अधिकारांची विभागणी केलेली आहे. केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्यामध्ये संबंध कसे असावेत याबाबत सविस्तर पद्धतीने राज्यघटनेमध्ये तरतूद केलेली आहे.आजपर्यंत आरोग्य हा अतिशय अक्षम्य दुर्लक्ष झालेल्या एक महत्त्वाचा मुद्दा आहे. यामध्ये आरोग्य हा विषय वास्तविक पाहता राज्य सूची मध्ये आहे आरोग्य व आरोग्य विषयी काही धोरणात्मक निर्णय घेणे या सगळया बाबी हा राज्याच्या अधिकारामध्ये येतात.

कोरोनाचे संकट निर्माण झाले त्या सुरुवातीच्या काळामध्ये राज्यांनी आपापल्या पातळीवर त्या संकटाला रिस्पॉन्स देण्याला सुरुवात केली. केंद्राने सुद्धा आपापल्या पद्धतीने त्याला तोंड देण्यासाठी काही निर्णय घेतले. परंतु मध्यंतरी एक गोष्ट आपल्या लक्षात येईल की केंद्राने अचानक पणे आरोग्याच्या सगळ्या बाबतीमधील जे निर्णय आहेत ते आपल्या हातामध्ये घेतले. कोरोनाची जी औषध असतील ती केंद्र सरकार खरेदी करेल आणि त्याचा पुरवठा राज्याना करेल. राज्याने आरोग्याच्या बाबतीत कुठल्याही प्रकारची खरेदी करू नये अशा प्रकारचे साधारण परिनियम केंद्राने दिले. म्हणजेच आरोग्य हा विषय राज्य सूचीत येऊन सुद्धा केंद्राने या काळामध्ये आपल्याकडे घेतला त्यामुळे केंद्र व राज्ये यामध्ये तणाव निर्माण झाला. आपल्या देशामध्ये आय. सी. एम. आर. नावाचे वैज्ञानिक संस्था आहे केंद्र सरकार यांच्या सूचनेनुसार म्हणजे आरोग्याच्या बाबतीत निर्णय घेत असते.परंतु केंद्राने आय. सी .एम.आर. च्या तसेच राज्यांच्या सूचनाकडे दुर्लक्ष करून अनेक निर्णय घेतले.

**जी.एस.टी. च्या परताव्याबाबत विलंब :**

दुसरा महत्त्वाचा मुद्दा आहे तो म्हणजे आर्थिक बाबतीत असणारा जी.एस.टी. च्या परताव्याबाबतचा विलंब हा आहे.जी.एस.टी.ची रक्कम केंद्र सरकारकडे गोळा होते आणि ज्या राज्याकडून कोणत्या प्रमाणामध्ये किती टक्के मध्ये जीएसटी मिळालेला आहे त्या टक्केवारीनुसार ते परत पुन्हा केंद्राकडून राज्याला रिलीज केले जातात.परंतु बऱ्याच राज्यांना केंद्रानं अशा प्रकारचा निधी तत्परतेने तसेच त्यांच्या प्रमाणात परत दिलेला नाही. तसेच महाराष्ट्रात जर उदाहरण घेतलं तर महाराष्ट्र राज्याने अनेक वेळेस मागणी केली तरी फारशी मदत केंद्राकडून मिळालेली दिसत नाही. म्हणजे आर्थिक संबंधांच्या बाबतीत मध्ये सुद्धा केंद्र आणि राज्य सरकार यांच्यामध्ये तणाव निर्माण झालेले आहे. केरळ,पश्चिम बंगाल या राज्यांना सुद्धा तेवढ्या प्रमाणात केंद्राने निधि दिलेला नाही. यामुळे कोरोंना च्या गंभीर काळात राज्यांची आर्थिक परिस्थिति अत्यंत नाजुक झाली होती.

**राज्यपालांची भूमिका :**

राज्यपालाचे बाबतीमध्ये केवळ आजच नाही तर कॉंग्रेस सरकार च्याही काळात राज्यपालांची भूमिका ही सातत्याने केंद्राच्या बाजूची राहिलेली आहे.मात्र कोरोंनाच्या काळात तरी राज्यपालांनी राज्याच्या बाजूने नि:पक्षपातीपणे भूमिका घेणे अपेक्षित होते. परंतु तसे न होता राज्यपालांनी महाराष्ट्र,केरळ ,प.बंगाल ई. राज्यात हस्तक्षेपाची, विरोधाची भूमिका घेतलेली दिसते.राज्यपाल समांतर पद्धतीचे सरकार चालवत आहेत अशी टीका झालेली पाहावयाला मिळते. राज्यपालांची भूमिका वेगळी आणि मंत्री मंडळाची भूमिका वेगळी असे चित्रा दिसले. उदा.महाराष्ट्र सरकारने अंतिम वर्षाच्या परीक्षा कोरोंनाच्या काळात घेऊ नयेत त्याऐवजी मागील वर्षीच्या गुणांच्या वरुन त्यांना त्या प्रमाणात अंतिम वर्षाचे गुण द्यावेत असा निर्णय घेतला होता.परंतु राज्यपालांनी मान्य केला नाही त्यामुळे या बाबतीत मोठा तणाव निर्माण झाला होता. केरळ मध्ये कोरोंनाच्या परिस्थितीवर चर्चा करण्यासाठी विधानसभेचे अधिवेशन बोलविण्याला राज्यपालांनी विरोध केला होता.एकूणच भारतामधील आजपर्यंतचे संघराज्य हे जास्तीत जास्त को-ऑपरेटिव्ह पद्धतीने चालत आले आहे. कोरोनाच्या काळात मात्र हे संघराज्य संघर्षात्मक संघराज्य पद्धतीने वाटचाल करत आहे.

**नोकरशाहीची आणीबाणी :**

कोरोंनाच्या नावाखाली देशामध्ये नोकरशाही चे एक प्रकारचे दडपशाही असल्याचे चित्र होते.गौतम नावाचे विचारवंत म्हणतात की, भारतामध्ये एक्झिक्युटिव्ह इमर्जन्सी लागू झाली आहे यामध्ये नोकरशाहीची तसेच कार्यकारी मंडळाची आणीबाणी निर्माण झालेली आपल्याला दिसते.उदा.जोधपुर येथे मास्क घातला नाही म्हणून एका व्यक्तीला पोलिसांनी मारहाण केली होती.लॉकडाउन च्या काळात केंद्र आणि राज्य पातळीवरील महसूल आणि पोलिस प्रशासन एवढे कार्यक्षम झाले होते की, त्यांची एक प्रकारची दहशत निर्माण झाली होती.

**सर्वोच्च न्यायालयाची महत्वपूर्ण भूमिका:**

सर्वोच्च न्यायालयाची भूमिका सर्वोच्च न्यायालयाची भूमिका ही सातत्याने अलीकडच्या काळामध्ये आपण बघितले तर सातत्याने वाढलेली आहे. न्यायालय अनेक वेळेस स्वतःचे निर्णय जाहीर करून एक्झिक्यूटिव्ह काम करताना आपल्याला दिसतात. परंतु कोरोंनाच्या सुरुवातीच्या काळामध्ये न्यायालयाने फारसं लक्ष दिलं नाही. कोरोंनाच्या बाबतीत कार्यकारी मंडळाने आपली कार्ये पार पाडावीत असे म्हंटले.परंतु विस्थापित कामगार , कच्चे कैदी, लहान बालके , स्त्रिया ,वृद्ध यांचे हॉट असलेले अतोनात एचएएल पाहून

न्यायालये सक्रिय झाली. उदा. आंध्र प्रदेशच्या हाय कोर्टाने निर्णय दिला की कामगारांना कशा पद्धतीने तुम्ही सुविधा दिल्या पाहिजेत याची एक लिस्ट जाहीर केली. कामगारांच्या बरोबर डॉक्टर पाहिजे,शुद्ध पाणी दिले पाहिजे, औषध, निवाऱ्याचीव्यवस्था दिली पाहिजे अशा सूचना दिल्या.गरीब-श्रीमंत असा कुठलाच भेदभाव न ठेवता शासकीय दवाखाने आणि प्रायव्हेट हॉस्पिटल यामुळे कुठलाही भेदभाव न करता सर्व प्रकारच्या हॉस्पिटल्समध्ये त्या कोरोनाच्या टेस्ट फ्री करा. दुसरा मुद्दा म्हणजे सर्वोच्च न्यायालयाने कोरोनाचा प्रसार रोखण्यासाठी कच्च्या कैद्यांना सोडून देण्याचे आदेश दिले. कोरोना झालेल्या वृद्ध तसेच स्त्रियांना चांगली वागणूक देण्याविषयी मार्गदर्शक सूचना दिल्या. कोरोनामुळे मृत्यू झालेल्या प्रेताची योग्यव सन्मानपूर्वक विल्हेवाट लावणे,कोरोनाच्या उपचाराबाबत हॉस्पिटल ची बिले योग्य प्रमाणात करणे ई .बाबत सूचना कोर्टाने दिल्या. एकूणच सर्वोच्च तसेच उच्च न्यायालयाने कोरोना काळात व्यक्तींची सन्मान जपण्यावर भर दिला होता ही अतिशय महत्वाची बाब आहे.

**निवडणूक प्रचार यंत्रणा मध्ये बदल:**

भारताची निवडणूक प्रक्रिया हा एक मोठा फेस्टिवल असतो. नेत्यांना तसेच मतदारांना रोड शो करण्याची सवय आहे. यापुढे कोरोनासारख्या महामारीमुळे अशा प्रकारचे रोडशो वर मर्यादा येतील. येणाऱ्या निवडणुकांमध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्स की ज्याला रोबोटिक्स म्हणले जाते त्याच्यावर आधारित निवडणुक प्रचार यंत्रणा राबवली जाईल. जास्तीत जास्त पद्धतीने ऑनलाइन माहितीची देवाणघेवाण होईल सोशल मीडिया चा मोठ्या प्रमाणात वापर होणार आहे. व्यक्तीच्या मतदार वर्तनाचे मॉनिटरिंग मोठ्या प्रमाणामध्ये टेक्नॉलॉजीच्या माध्यमातून केले जाणार आहे.निवडणुकीचे तंत्रही टेक्नोसॅवी होणार आहे आणि त्यामुळे निवडणुकीच्या बाबती मधला हा मोठा बदल भारतीय राजकारणामध्ये होणार आहे.

**समारोप :**

कोरोना सारख्या महामारीमुळे यापुढे सरकारची शक्ती ही मोठ्या प्रमाणामध्ये वाढणार आहे. व्यक्तिस्वातंत्र्यावर मोठ्या प्रमाणामध्ये वेगवेगळ्या पद्धतीने अंकुश घातले जात आहेत.भारतीय संसदीय पद्धती हळूहळू अध्यक्षीय लोकशाही कडे वळवण्याचा प्रयत्न कार्यकारी मंडळाकडून होऊ लागला आहे. ज्येष्ठ नागरिक, मुलं आणि स्त्रिया यांच्या वरचे अत्याचार वाढताना दिसत आहेत. कोरोनाच्या काळात घरगुती हिंसाचार वाढलेला दिसून आला परंतु त्याची फारशी दखल पोलिस किवा अन्य शासकीय यंत्रानेणी घेतली नाही ही गंभीर बाब आहे. केंद्राने संघर्षा ऐवजी सहकार्यात्मक संघराज्याची भूमिका घेणे आवश्यक आहे.एकूणच कोरोना मुले भारतीय राजकरणावर अनेक बाबतीत परिणाम झालेले आहेत.सर्वोच्च आणि उच्च न्यायालयाने मात्र कोरोना काळात अतिशय सकारात्मक आणि जबाबदारीने आपली भूमिका पार पाडलेली आहे. एकूणच नागरिकांचे व्यक्तिस्वातंत्र्य अबाधित ठेवणे, संसदीय शासन पद्धती अधिक सुदृढ करणे आणि प्रगतीचे, धर्मनिरपेक्ष तसेच विधायक राजकारण करणे आवश्यक आहे. या सर्व चांगल्या बाबी करण्यासाठी सिविल सोसायटी तेवढीच प्रगल्भ करणे आवश्यक असून यामध्येच भारतीयांचे हित आहे.

**संदर्भ:**


- Bhatiya Gautam , (2021),*The Transformative Constitution – A Radical Biography in Nine Acts,* New Delhi: Harper Collins
- Granville Austin, (1966), *Indian Constitution Corner Stone of a Nation*, New Delhi ; Oxford
- Kulkarni Mukta,Ghotale Vivek & others (Editors),(2021), *Lokdown Aani Lokashahiche Apaharan (Marathi)* , Pune : The Unique
- Mander Harsh,(2021), *Locking Down the Poor – The Pandemic and India's Moral Centre* , New Delhi : Speaking Tiger
- Mody Zia (2013), *10 Judgements That Changed India*,New Delhi:Penguin
- Sathe, S.P. (2001),*Judicial Activism in India,* OUP,New Delhi
- Sinha R.K.(2020),*Impact of COVID-19 on Rural India*,New Delhi : Kalpaz
- Magazine &Articles in Newspaper …EPW, Frontline, Parivartanacha Watsaru, Samaj Prabodhan Patrika etc.,The Indian Express, Loksatta
- Webliography
- www.livelaw.in
- www.parliamentofindia.nic.in
- www.orfonline.org
- https://en.m.wikipedia.org